**दि.०४.११.२०१९ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिची सभेचा कार्यवृत्तांत.**

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा.आयुक्त यांचे कक्षामध्ये दि.०४.११.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजीत करण्यात आली होती. या सभेस खालील सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

मा.आयुक्त, अध्यक्ष
मा.श्री.अजय गोंडाणे, सदस्य
मा.श्री.प्रशांत डवरे, सदस्य
मा.श्री.मधुभाऊ घारड, तांत्रिक सदस्य
मा.श्री.अनिल घोम, निमंत्रित सदस्य
मा.उप-आयुक्त(प्रशा.)
मा.उप-आयुक्त(सा.)
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.१
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.२
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.३
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.४
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.५
मा.स.सं.न.र.अधिकारी
मा.उद्यान अधिक्षक, म.न.पा.
मा.मनोहर ना.धजेकर, उपअभियंता(कार्य.)
मा.श्री.आर.जे.भाकरे, (स.अ.-२)
मा.श्री.एस.झेड. काझी, उप-अभियंता
मा.श्री.एस.एस.शेंडगे, (का.अ.)

मा.उद्यान अधिक्षक मनपा यांनी सभेसाठी कोरम नसल्याचे सुचविले त्यामुळे मा.सभापती यांचे परवानगीने सभा १० मिनीटे स्थगित करुन सभा पुन्हा सुरुवात करण्यात आली.

विषय पत्रीकेतील

विषय क्र.१ :- दि.१३.०८.२०१९ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचे कार्यवृत्तांत समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आले.
कार्यवृत्तांचे सर्व सदस्यांनी अवलोकन केले.

विषय क्र.२ :- दि.१३.०८.२०१९ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत निर्णयाप्रमाणे कार्यपुर्ती अहवाल समिती समोर वाचून दाखविण्यात आला. समितीने कार्यवृत्तांताच्या कार्यपूर्ती अहवालाचे अवलोकन केले.

विषय क्र.३ :- झोन क्र. १ ते ५ चे वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त अर्जाबाबत त्यांनी सादर केलेल्या अहवालावर चर्चा करुन निर्णय घेणे.
अहवाल सादर करण्यात आले.

**उत्तर झोन क्र. १**

**अर्ज क्र.१:—** श्री.व्हि.एस.ढोले, राठी नगर अमरावती. १ चिकु वृक्ष च्या फांद्या तोडण्याची कार्योत्तर परवानगी देणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — विद्युत तारांवर येणाऱ्या फांद्या काढण्याकरीता उपअभियंता MSEB यांना पत्र देण्यात आलेले आहे. प्रकरण कार्योत्तर मान्यतेकरीता सविनय सादर.

**ठराव क्र.१:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:—** श्री.ऊ.य.घोडे, केवल कॉलनी क्र.२अमरावती. ४ (निम, गोंधन, पिंपळ/वड व मुंगना) वृक्ष तोडल्याची तक्रार बाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — अर्जदार यांचे प्राप्त तक्रारीनुसार श्री.वावरे, श्री.तायडे, श्री.खाकसे, श्री.किल्लेदार व श्री.भटकर यांनी नमुद प्रमाणे निम, गोधंन, वड, मुंगणा असे एकूण ४ वृक्ष तोडल्याबाबत तक्रार दाखल केली होती. त्याअनुषंगाने तपासणी केली असता नमुद लोकांव्दारे निम वृक्ष तोडल्याचे दिसून आले नाही तसेच मुंगणा गोंधन वृक्ष अर्ध्यातून कापण्यात आले व पिंपळ/ वड वृक्षाच्या फांद्या छाटण्यात आल्या असल्याने संबंधितांना कलम २१ पोटकलम (१)(२) नुसार दि.०३.०९.२०१९ रोजी नोटीस बजावण्यात आलेली आहे. नोटीसचे अनुषंगाने संबंधितांकडून खुलासा प्राप्त झालेला असून दोन पोलच्या मधात झाड असल्याने व ते वाढून त्यांच्या फांद्या ह्या पोलच्या ताराला टच होत असल्याने घरांची लाईन बंद झालेली होती तसेच पंक्चुवेट होत होती त्यामुळे विद्युत विभागाने दिलेल्या सुचनेनुसार झाडांच्या फांद्या छाटण्यात आल्या आहेत. आम्ही स्वत: वृक्षप्रेमी असल्याने आमच्या प्रत्येकाच्या घरासमोर झाड लावून कुंपन



Scanned by CamScanner

केलेले आहे. झाडाच्या फांद्या आम्ही त्रासामुळे कापलेल्या आहेत. वृक्ष तोड केलेली नाही. अशा आशयाचा खुलासा सादर करण्यात आलेला आहे. प्रकरण मा.वृक्ष समितीचे अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सादर.
**ठराव क्र.२:-** वृक्ष अधिकारी यांनी योग्य निर्णय घेवून कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:**— यमुनाबाई वामनराव थोरात, भिमनगर अमरावती. १ आंबा वृक्ष काढण्याची परवानगी तुर्त नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता अर्जदाराच्या बाजुला असलेल्या मोकळ्या जागेवर आंब्याचा वृक्ष वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदार महिलेला घरकुल मंजुर झाल्याचे सांगण्यात आले. नियमाप्रमाणे अस्तित्वात असलेल्या घराचे जागेवरच बांधकाम करावयाचे असते तथापि वृक्ष असलेली जागा वेगळी दिसून येते. ससंनर/बांधकाम विभागाने शहानिशा करुन अहवाल मागवावे लागेल. त्यानंतर राज्यवृक्ष असलेल्या आंबा वृक्ष तोडण्याबाबत वृक्ष प्राधिकरणास निर्णय घेता येइल. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी तुर्त नाकारण्यात यावी. उचित निर्णयार्थ सादर.
**ठराव क्र.३:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची परवानगी तुर्त नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.४:**— श्री.विष्णू रा.लांडगे, सिध्दार्थ नगर अमरावती. १ नारळ वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता नारळ वृक्ष संपूर्ण वाळलेला असल्याने वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच त्या बदल्यात १ वृक्ष लावायचे अर्जदाराला सुचित करावे लागेल. उचित निर्णयार्थ सादर.
**ठराव क्र.४:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे धोरणानुसार १ वाळलेला वृक्ष काढणेच्या बदल्यात १ वृक्ष लावणे व लावलेल्या वृक्षाचा अहवाल दर सहा महिण्यांनी तीन वर्षेपर्यंत द्यावा लागेल. वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.५:**— श्री.हनुमंत दे.भोंबे, आशियाड कॉलनी अमरावती. ३ भिंगरी वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी करण्यात आली. अर्जदाराने भिंगरी ३ झाडे धोकादायक असल्याने तोडण्याची परवानगी मागितलेली होती. तीनही भिंगरी वृक्षांची छान वाढ झालेली होती त्यापैकी दोन वृक्ष अर्जदाराने ४ फुट बुंधा ठेवून पुर्णपणे तोडून टाकलेली आहे. अर्जदाराने बेदरकारपणे सार्वजनिक जागेवरील मोठी वाढलेली वृक्ष तोडून नष्ट केली व लाकुड चोरुन नेले आहे. सबब अर्जदाराला विनापरवानगी सार्वजनिक रस्त्यावरील वृक्षतोड केल्याबाबत स्पष्टीकरण मागवावे लागेल व त्यानंतर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करता येईल. तसेच एक भिंगरी वृक्ष रस्त्याचे कडेला छान वाडलेला व हिरवागार आहे. अर्जदारास वृक्षाचा काही संबंध नाही. कोणतीही अडचण नाही सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसेच अर्जदाराने वृक्षाला इजा पोचवू नये. असे आदेशित करावे लागेल. उचित निर्णयार्थ सादर.
**ठराव क्र.५:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य, वृक्ष तोड केल्याबाबत स्पष्टीकरण मागवून त्या नंतर दंडात्मक कार्यवाही करावी व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात येत असून वृक्षाला इजा पोहचू नये असे पत्र द्यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.६:**— श्री.सुधाकर मधुकर दांडगे, न्यु हनुमान नगर अमरावती. १ भिंगरी वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — दि.०१/११/२०१९ रोजी तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी करण्यात आली. भिंगरीचा वृक्ष रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराचा व वृक्षाचा काही संबंध नाही तसेच कोणतीही अडचण नाही सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी तसेच अर्जदाराने वृक्षाला इजा पोहचवू नये असे फर्मावण्यात यावे. उचित निर्णयार्थ सादर.
**ठराव क्र.६:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.७:**— श्री.प्रभाकर तु.कुसरे, समता कॉलनी अमरावती. २ पाम, २ नारळ वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता अर्जदाराकडे असलेली पाम व नारळ वृक्ष त्यांचे घराचे आवारात छान सरळ वाढलेली व हिरवागार आहेत. या वृक्षांवर १०-१८ सुग्रन पक्षाची छान घरटे आहेत. कोणतीही अडचण दिसून आली नाही. शेजाऱ्यांच्या त्रासामुळे वृक्ष तोडण्याचा अर्ज केल्याचे सांगण्यात आले. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसेच अर्जदाराच्या शेजारील श्री.एस.बी.पांडे व श्री.गजानन उमाळे यांची घरे २००० स्क्वे.फुट पेक्षा अधिक प्लॉटवर आहेत परंतु त्यांनी एकही वृक्ष स्वत:चे घरी लावलेला नाही. सबब श्री.उमाळे, श्री.पांडे यांना नागरी क्षेत्रा झाडांचे संगोपन व जतन अधिनियम १९७५ चे कलम ५ व कलम ९(१) नुसार स्वत:चे घराचे परिसरात/आवारात किमान दोन वृक्ष लावून वृक्ष प्राधिकरणास ३० डिसेंबर २०१९ पर्यंत अहवाल सादर करण्यासचे आदेशित करावे लागेल. त्यांचा अहवाल ३० डिसेंबर २०१९ पर्यंत प्राप्त न झाल्यास दंडात्मक कार्यवाही पुढील वृक्ष प्राधिकरण बैठकित प्रस्तावित करता येईल. उचित निर्णयार्थ सादर.
**ठराव क्र.७:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.८**:— श्री.दिपक लक्ष्मण वानखडे, मोहन नगर अमरावती. १ निम वृक्ष च्या फांद्या अवैधरीत्या छाटल्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल —तांत्रिक सदस्य समवेत दि.०२/०८/२०१९ रोजी स्थळ पाहणी केली असता नमुद निम वृक्ष छान वाढलेला व हिरवागार होता. अर्जदाराने वृक्षांच्या फांद्या पुर्वीच मोठ्या प्रमाणात काढून टाकल्याचे दिसून आले. तसेच रस्त्यावरील सप्तपर्णी वृक्षांच्याही फांद्या विनापरवानगी छाटुन टाकल्याचे दिसून आले. अर्जदाराला विना परवानगी कडुनिंब वृक्षांची मोठ्याप्रमाणात छटाई केल्याबाबत नोटीस देवू स्पष्टीकरण मागवावे लागेल. उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र.८**:- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे अर्जदाराला नोटीस देण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.९**:— श्री.शामकांत उल्हे, पद्म सौरभ कॉलनी अमरावती. १ वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता वृक्ष रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षांचा व अर्जदाराचा काहीही संबंध नाही. करीता वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसे अर्जदाराने एकही वृक्ष स्वत:चे घरी लावलेला नाही. सबब श्री.उल्हे यांना नागरी क्षेत्र झाडांचे संगोपन व जतन अधिनियम १९७५ चे कलम ५ व कलम ९(१) नुसार स्वत:चे घराचे परिसरात/आवारात किमान दोन वृक्ष लावून वृक्ष प्राधिकरणास ३० डिसेंबर २०१९ पर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेशित करावे लागेल. त्यांचा अहवाल ३० डिसेंबर २०१९ पर्यंत प्राप्त न झाल्यास दंडात्मक कार्यवाही पुढील वृक्ष प्राधिकरण बैठकित प्रस्ताति करता येईल. उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र.९**:- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे अर्जदाराला नोटीस देण्यात यावी व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१०**:— श्री.पंकज काळे, मोहन कॉलनी अमरावती. १ निलगीरी वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता निलगीरीचा वृक्ष छान वाढलेला आहे. वृक्ष शेताच्या धुऱ्यावर व रस्त्याचे कडेला आहे. नियमाप्रमाणे धुऱ्यावरील कोणताही वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी व अर्जदाराला वृक्षाला इजा पोचणार नाही असे आदेशित करावे लागेल. तसेच यापुर्वी दि.०१.०७.२०१९ च्या अर्जानुसार अर्जदाराला तीन बाबळीच्या फांद्या छटाईची परवानगी दिली होती. अर्जदाराने नमुद वृक्षांची सर्व फांद्या छटाई करुन फक्त खोड उभी ठेवलेली आहे. याबाबत अर्जदाराला नोटीस देवून दंडात्मक कार्यवाही का करण्यात येवू नये याबाबत स्पष्टीकरण मागवावे लागेल. उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र.१०**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. अर्जदाराला नोटीस देण्यात यावी. व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.११**:— श्री.शशिकांत येवतकर, खिस्त कॉलनी अमरावती. १ बदाम वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता अर्जदाराचे घरी कोणीही नव्हते तसेच गेट उघडे असल्याने पाहणी करण्यात आली. बदाम वृक्ष घराच्या आवारात छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराने झाडाच्या बुडापर्यंत कॉंक्रीट केल्याने समस्या निर्माण झाली आहे. करीता कॉंक्रीट काढण्याचे आदेश अर्जदाराला द्यावे लागेल व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र.११**:- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे अर्जदाराला कॉंक्रीट काढण्याचे पत्र देण्यात यावे. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१२**:— श्री.सुभाष रंगे, गाडगे नगर अमरावती. १ भिंगरी वृक्ष च्या फांद्या तोडण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता मनपाचे ट्रिगार्डमध्ये रस्त्याचे कडेला छान वाढलेला हिरवागार वृक्ष आहे. अर्जदाराच्या दुकानाच्या बोर्डाला झुकलेली एक फांद्यी तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. सदर वृक्षाचे ट्रिगार्ड काढून कडेला असलेल्या वडाच्या पारंब्यांना ट्रिगार्डव्दारे संरक्षित करण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करावी लागेल. तसेच सदर पारंब्यांची देखरेखची जबाबदारी नमुद अर्जदाराला सोपविण्यास हरकत नाही. उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र.१२**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य व अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१३**:— श्री.उमेश चौबे, राधा नगर अमरावती. ५ विविध वृक्ष च्या फांद्या तोडण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता नमुद वृक्ष रस्त्याचे कडेला छान व हिरवागार वाढलेला आहे. वृक्षाची अर्जदाराला काही अडचण नाही. करीता वृक्ष तोडण्याची / छाटण्याची आवश्यक्ता वाटत नाही. तथापी दोन वृक्षांच्या वाळलेल्या फांद्या शक्तीमानव्दारे काढावे लागेल. उचित निर्णयास सादर.



Scanned by CamScanner

**<u>ठराव क्र.१३</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून दोन वृक्षाच्या वाळलेल्या फांद्या शक्तीमान मशिनव्दारे तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.१४</u>**:– श्री.सुभाष वामनराव काळे, संकेत कॉलनी अमरावती. १ नारळ वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता नमुद वृक्ष अर्जदाराचे आवारात छान वाढलेला व हिरवागार आहे. गरज नसतांनाही अर्जदाराने झाडाच्या फांद्या काढल्या तसेच आता त्यांना वृक्ष तोडावयाचा असल्याने त्यांनी सांगितले. अर्जदाराने झाडाच्या बुडापर्यंत कॉक्रीट केल्याने समस्या निर्माण झालेली आहे. करीता कॉंक्रीट काढण्याचे आदेश अर्जदाराला द्यावे लागेल व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**<u>ठराव क्र.१४</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे अर्जदाराला कॉंक्रीट काढण्याची नोटीस देण्यात यावी. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.१५</u>**:– श्री.गुणवंत देशमुख, सुरभी विहार कॉलनी अमरावती. १ वृक्ष काढल्याबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी केली असता अर्जदाराच्या तक्रारीमध्ये तथ्य आहे. मनपाच्या ट्रिगार्ड मध्ये लावलेली वृक्ष तोडण्यात आलेली असल्याचे दिसून आले. ट्रिगार्डचीही मोडतोड केलेली दिसून येते. पुढील असलेले वृक्ष ट्रिगार्ड यांचे संरक्षणासाठी उद्यान विभागाने पोलिसात तक्रार करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. जेणेकरुन लावण्यात आलेल्या वृक्षांना संरक्षण मिळेल. उचित निर्णयार्थ सादर.

**<u>ठराव क्र.१५</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.१६</u>**:– श्री.लक्ष्मीकांत डागा, कॅम्प अमरावती. ७ वृक्षाची अनामत रक्कम मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सन २०१४ मध्ये अर्जदाराला बांधकामात अडचण निर्माण करणारे एकूण ७ वृक्ष काढण्याकरीता अनामत रक्कम स्विकारुन वृक्ष काढण्याची परवानगी प्रदान करण्यात आली होती. नियमानुसार दर ६ महिन्याने ३ वर्षापर्यंत अर्जदाराने अहवाल सादर केल्याचे दिसून येत नाही. तथापि त्यांचे दि.३०.०९.१९ रोजी प्राप्त पत्रानुसार त्यांनी १४ नविन वृक्ष लावल्याचे नमुद आहे व त्यांनी तत्कालीन वेळेस भरलेली अनामत रक्कमत परत मिळण्याबाबत विनंती केली आहे. उचित निर्णयार्थ सादर.

**<u>ठराव क्र.१६</u>**:- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालात नमुद प्रमाणे अर्जदाराने वृक्ष लागवडी पासून ते दर ६ महिण्यांनी ३ वर्षापर्यंत चे अहवाल सादर केले नसल्याचे दिसते. वृक्ष अधिकारी यांनी अर्जदाराला पुन्हा पत्र द्यावे व तसे कळवावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.१७</u>**:– डॉ.नितीन व्यवहारे, निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती.२३ निलगीरी वाळलेले वृक्ष काढण्याची परवागनी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – विहीत नमुन्यात अर्ज सादर केलेला नाही परंतु सदर परिसरामध्ये नागरीकांची वरदळ व आवाजावी मोठ्या प्रमाणात असते अर्जदाराने सादर केलेल्या अर्जानुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात एकूण २३ वाळलेली वृक्ष काढण्याकरीता परवानगी मागीतलेली आहे. नमुद वाळलेली वृक्ष पडल्यास जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता नमुद २३ वृक्ष काढून प्रचलित नकाशानुसार वाळलेली वृक्षाच्या बदल्यास एक वृक्ष असे एकूण २३ वृक्ष लागवड करण्याचे आदेशित करावे लागेल. उचित निर्णयार्थ सादर.

**<u>ठराव क्र.१७</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.१८</u>**:– श्री.सुधाकर लक्ष्मण काशीकर, आय.टी.आय.कॉलनी अमरावती. १ निम वृक्ष काढण्याची परवागनी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – स्थळ पाहणी करण्याकरीता अर्जदाराचे घरी तांत्रिक सदस्य समवेत गेलो असता अर्जदार घरी नसल्यामुळे व घराला कुलूप असल्यामुळे वृक्ष पाहणी करता आली नाही. पाहणी करुन पुढील सभेत सादर करता येईल. उचित निर्णयर्थ सादर.

**<u>ठराव क्र.१८</u>**:- वृक्ष अधिकारी यांनी तांत्रिक सदस्य समवेत पाहणी करुन अहवाल पुढील सभेत सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.१९</u>**:– श्री.संतोष मोतीराम ठाकूर विलास नगर अमरावती. १ निम वृक्ष काढण्याची परवागनी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – स्थळ पाहणी करण्याकरीता अर्जदाराचे घरी तांत्रिक सदस्य समवेत गेलो असता अर्जदार घरी नसल्यामुळे व घराला कुलूप असल्यामुळे वृक्ष पाहणी करता आली नाही. पाहणी करुन पुढील सभेत सादर करता येईल. उचित निर्णयर्थ सादर.

**<u>ठराव क्र.१९</u>**:- वृक्ष अधिकारी यांनी तांत्रिक सदस्य समवेत पाहणी करुन अहवाल पुढील सभेत सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**मध्य झोन क्र.२**

**अर्ज क्र.१:-** मा.तहसिलदार, तहसिल कार्यालय अमरावती. १६ विविध वृक्ष, फांद्या काढण्याची परवानगी देणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२३.०८.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – वाळलेली दोन वृक्ष व चेंडूफळ वृक्षाच्या फांद्या तसेच कडूनिंब वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. इमारतीवर झुकलेल्या फांद्या फक्त काढण्यात याव्यात तसेच गेट जवळील निलगीरी वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदली ९ वृक्ष स्थानिक प्रजातीची त्याच परिसरात लावण्याचे आदेशित करण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.१:-** वाळलेली वृक्ष तातडीने काढण्याची परवानगी द्यावी व निलगिरी वृक्ष काढण्याचे वृक्ष प्राधिकरण समिती सभा चे धोरणानुसार परवानगी मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:-** ॲड सुधिर लोणे, राजेंद्र कॉलनी अमरावती. १ कडूनिंब वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१८.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. काढलेल्या वृक्षाच्या बदल्यात त्याच प्रजातीची अथवा स्थानिक प्रजातीची वृक्ष लावण्याचे फर्माविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.२:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:-** शाम नानाजी कोसरे, मुदलीयार नगर अमरावती. १ बेल वाळलेले वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१८.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – बेलाचा वाळलेला वृक्ष आहे त्यास काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदली त्याच प्रजातीचा वृक्ष लावण्याचे अर्जदारास फर्माविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.३:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. १ वाळलेला वृक्ष काढणेची परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.४:-** दिलीप म.पोपट, मनिभाई गुजराती एज्युकेशन सोसायटी अंबापेठ अमरावती. १ शेवगा वाळलेले वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२३.०८.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – शेवगा वृक्ष ३३ क्रमांकाचा वाळलेला एक वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदली त्याच परिसरात स्थानिक प्रजातीचे ३ वृक्ष लावण्याचे आदेशित करण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.४:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. १ वाळलेला वृक्ष काढणेची परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.५:-** मधुकर बाबाराव लसनापुरकर, श्याम नगर अमरावती. १ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२३.०८.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – वाळलेला सागवान वृक्ष (४० से.मी.गर्थ) काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदली त्याच परिसरात एक वृक्ष स्थानिक प्रजातीचा लावण्याचे फर्माविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.५:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. १ वाळलेला वृक्ष काढणेची परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.६:-** रमेश कन्हैयालाल शर्मा, पुजा कॉलनी, फरशी स्टॉप अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१८.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – कडूनिंबाचा वृक्ष अर्जदाराचे घराच्या आवारात वाढलेला आहे. दोन भागात मोठ्या फांद्या वाढलेल्या असल्याने एकीकडची फांदी छाटल्यास वृक्षाचे दुसरीकडे संतुलन बिघडते त्यामुळे वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. अर्जदाराकडे इतर अशोका, नारळ, आंबा असे आणखी ३ वृक्ष आहे. अर्जदार वृक्ष प्रेमी दिसून येत आहे. सबब कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्षाचे बदली ३ वृक्ष इतरत्र लावण्याचे सुचविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.६:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. १ वृक्ष काढणेच्या बदल्यात ३ वृक्ष लावणे याप्रमाणे वृक्ष प्राधिकरण समितीच्या धोरणानुसार अनामत रक्कम भरणा करुन परवानगी द्यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**अर्ज क्र.७:-** पद्मनाथन डी कोंडे, शाम नगर गल्ली नं.३ अमरावती. ५ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१८.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – अर्जदाराकडे घराच्या परिसरात सागवान, कडूनिंब, व इतर असे एकूण १४ वृक्ष आहेत. अर्जदाराकडे असलेल्या ९ सागवान वृक्षापैकी ५ वृक्ष ६० सेंटीमीटर पेक्षा जास्त जाडीचा बुंधा असलेली आहेत. अर्जदारास ५ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी धोरणाधिन राहून देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.७:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. वृक्ष प्राधिकरण समितीच्या धोरणानुसार कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.८:-** आशा रविंद्र उज्जेनकर, हमालपुरा अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१८.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – कडूनिंबाचा वृक्ष अर्जदाराचे शेजारी राहणारे श्री. अग्रवाल यांचे घराचे आवारात आहे. अर्जदाराचा काही संबंध नाही. वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. श्री.अग्रवाल यांना कोणतीही अडचण नाही. चर्चा केली सबब अर्जदारांकडे घराकडे झुकलेल्या २-४ इंच जाडीच्या फांद्या काढण्याची परवानगी वृक्षाचे मालक श्री.अग्रवाल यांचे सहमतीने काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. . उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.८:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.९:-** रुपेश रमेशराव डाफे, मांगीलाल प्लॉट छत्री टावर अमरावती. १ कडूनिंब, १ करंज वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१८.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – सार्वजनिक रस्त्यावर मनपाने लावलेली छान वाढलेली हिरवीगार वृक्ष आहेत. कोणताही धोका अडचण नाही. अर्जदार हॉटेल मालक डाफे यांचे दुकानाचा बोर्ड दिसत नाही म्हणून झाडाच्या छाटणी साठी केलेला अर्ज आहे. वृक्ष/फांद्या तोडण्याची गरज नाही. सबब परवानगी नाकारण्यात यावी. अर्जदाराने रस्त्यावरील वृक्षाला कॉंक्रीटीकरण केलेले आहे ते काढण्याच्या सुचना दिल्या. अर्जदाराने झाडाला इजा पोहचु नये असे फर्माविण्यात आले. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र.९:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे अर्जदाराला कॉंक्रीट काढण्याची नोटीस देण्यात यावी. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१०:-** आनंद छत्रपती दळवी/के.डी.असोसीएट्स, राजापेठ अमरावती. १ बेल, २ बदाम, १ अशोका, १ चिंच, १ आपटा, १ गोंदन, ३ नारळ वाळलेली वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१८.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले.
मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – अर्जदाराचे हॉटेलचे बांधकाम आहे. (सी.सी.) ससंनर विभागाने बांधकामाची परवानगी दिल्याचे दिसून येते. बांधकाम नकाशात प्रत्यक्ष बांधकामात येणारी व काढावी लागणारी वृक्ष लाल रंगाने व बांधकामाबाहेर असलेली व राखल्या जावू शकणारी वृक्ष हिरव्या रंगाने चिन्हांकित करणे गरजेचे होते. परंतु ससंनर विभागाने अभियंत्यांनी चिन्हांकन केले नसल्याने प्रकरण ससंनर विभागाकडे पाठवून संबंधित अभियंत्याने वरील प्रमाणे चिन्हांकित करुन प्रतयक्ष स्थळ निरीक्षणास हजर रहावे. त्यानंतर कोणती व किती वृक्ष काढायची याबाबत निर्णय घेता येईल. तुर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. ससंनर विभागाला पत्र देवून अहवाल मागविण्यात आला. उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने सदर प्रकरणी मा.तांत्रिक सल्लागार यांचे अहवालानुसार दि.२३.०९.२०१९ जा.क्र.४२८ नुसार बांधकामामध्ये वृक्ष येतात किंवा कसे याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल दि.०५/१०/२०१९ रोजी आ.क्र. ५५९ ससंनर विभागामार्फत प्राप्त झाला आहे. तरीही सोबत जोडलेल्या नकाशामध्ये बांधकामात येणारी व काढावी लागणारी वृक्ष लाल रंगाने चिन्हांकित केलेली आहे तरी वृक्ष बांधकामामध्ये प्रभावित होत असल्याचे दर्शविले आहे. नकाशा हा सलग्न जोडलेला आहे. ससंनर अभियंताचा अहवाल पाहिला प्रत्यक्ष स्थळावर सामुहिक पाहणीसाठी अभियंताना उपस्थित राहण्याच्या सुचना देवून वेळ ठरवावी म्हणजे प्रत्यक्ष लेआऊट टाकुन किती व कोणती वृक्ष बांधकामात येतात याचा जागेवरच निर्णय घेता येईल. पत्र देण्यात आले आहे. आज दि.३०.१०.२०१९ पुन्हा सामुहिक स्थळ निरीक्षण केले त्यावेळी ससंनरचे अभियंता श्री.भटकर उपस्थित होते. ससंनरच्या दि.०३.१०.२०१९ च्या अहवालावरुन प्रत्यक्ष फेर पाहणी करण्यात आली. इमारत व्यावसाईक असून त्याला बेसमेंट पुर्ण वापरण्याची मुभा देण्यात येत असते, त्यानुसार (बांधकामात येणारी १० वृक्ष ज्यात बेल-१, बदाम-२, अशोका-१, चिंच-१, आपटा-१, गोंधन-१, नारळाची वृक्ष -३ आहेत म्हणजे एकुण १० वृक्ष) व्यावसायिक बांधकाम असल्याने १०x१०=१०० वृक्ष लावण्यासाठी अर्जदारांनी संमती दर्शविली असून त्यासाठी लागणारी ठेव रक्कम १००x३४६०=३४६०००/- अक्षरी तीन लाख छेचाळीस हजार फक्त वृक्ष प्रधिकरणाकडे ठेव ठेवल्यानंतर वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. अर्जदारांनी त्यांना शक्य होईल तिथे १०० वृक्ष लावावीत व लावल्यानंतरचा अहवाल



Scanned by CamScanner

जी.ओ.टॅग सह पाठवून दर सहा महिन्यांनी वृक्ष वाढत असल्याचा अहवाल छायाचित्रात तीन वर्ष पाठवावा, त्यांनतर त्यांना ठेव परत मिळू शकेल. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१०:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे १० वृक्ष काढणेच्या बदल्यात १०० वृक्ष लावणे याप्रमाणे १००x३४६०= ३४६०००/- रु. अनामत ठेव ठेवून व लागवड केलेल्या वृक्षाचा अहवाल दर ६ महिन्यांनी ३ वर्षेपर्यंत सादर करावा लागेल याप्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.११:-** श्री.डॉ.मुरलीधर एम.बुब, देवरणकर नगर अमरावती. २ अशोका वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – वृक्ष प्राधिकरण समिति सभा दि.२६.०४.२०१९ ठराव क्र.४ नुसार ससंनर विभाग यांना अहवाल मागण्यात आला होता. दि.१६.०८.२०१९ रोजी ससंनर विभाग मनपा अमरावती यांच्या अभियंत्यांचे अहवालानुसार मा.तांत्रिक सदस्य यांनी २ अशोका वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही व त्या बदली ६ वृक्ष लावण्यासाठी ६x३४६०=२०७६०(वीस हजार सातशे साठ) रुपये फक्त ठेव ठेवल्यानंतर तसेच वृक्ष अहवाल नियमाप्रमाणे मिळाल्यानंतर ठेव परत करण्यात येईल. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.११:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. २ वृक्ष काढणेच्या बदल्यात ६ वृक्ष लावणे याप्रमाणे ६x३४६०= २०७६०/- रु. अनामत ठेव ठेवून व लागवड केलेल्या वृक्षाचा अहवाल दर ६ महिन्यांनी ३ वर्षेपर्यंत सादर करावा लागेल याप्रमाणे धोरणानुसार परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१२:-** सन्मा.नगरसेवक श्री.अजय सारसकर, अमरावती. १ वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.०८.०८.२०१९ रोजी सन्मा.नगरसेवक श्री. अजय सारसकर यांनी भ्रमणध्वनी व्दारा तक्रार मा.सहा.आयुक्त यांना कळविले असता त्यानुसार श्री.विनयभाऊ नगरकर व श्री.गुल्हाने नमुना गल्ली नं४ अमरावती यांच्या घराजवळील वृक्ष सार्वजनिक रस्त्यावर असून वृक्ष वादळामुळे मुळापासून पुर्णत निघून गेले. श्री.नगरकर यांच्या घरावर पडलेल्या अवस्थेत आढळून आले. वृक्ष तात्काळ काढणे गरजेचे आहे. अशी तक्रार मा.सहा.आयुक्त व उद्यान अधिक्षक यांना सन्मा. नगरसेवक श्री.अजय सारसकर यांनी भ्रमणध्वनी व्दारा तक्रार देण्यात आली. उद्यान अधिक्षक यांनी स्थळ निरीक्षण केले असता सदहू वृक्ष सार्वजनिक रस्त्यावर असल्याने उद्यान विभागामार्फत वृक्ष धोकादायक असल्याने वृक्ष तातडीने काढण्याची कार्यवाही करण्यात आली. कार्योत्तर मान्यतेसाठी प्रकरण वृक्ष प्राधिकरण समक्ष सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१२:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१३:-** श्री.चंद्रशेखर कुलकर्णी, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.२७.०८.२०१९ रोजी श्री.चंद्रशेखर कुळकर्णी यांनी भ्रमणध्वनी व्दारे तक्रार कळविली असता त्यानुसार अस्मिता विद्या मंदिराच्या समोरील व सुरेखा ठाकरे यांच्या दवाखान्याजवळ रोड वरील झाडाची प्रथमिक तपासणी केली असता सदर कडूनिंबाची वृक्ष सार्वजनिक रस्त्यावर असल्याचे निर्देशानास आले तथा सदर वृक्ष मुळांपासून पुर्णत: रस्त्यावर झुकले असल्याचे निर्देशनास येवून सदर वृक्षव्दारे दुर्घटना व जिवीत हानी होण्याची शक्यता लक्षात आल्याने सदर वृक्ष तात्काळ काढणे गरजेचे असल्याचा अहवाल माननीय सहा.आयुक्त यांनी उद्यान अधिक्षक यांना कळविले. त्यानुसार उद्यान विभागामार्फत वृक्ष तातडीने काढण्याचे कार्यवाही करण्यात आली करीता सदर प्रकरण वृक्ष प्राधिकरण सभेमध्ये कार्योततर मान्यतेसाठी वृक्ष प्राधिकरण समक्ष सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१३:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१४:-** श्री.नितीनराव पाटील, विजय कॉलनी साई अपार्टमेंटचे मागे अमरावती. १ कडूनिंब वृक्ष दंड भरणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर प्रकरण मा.तांत्रिक सल्लागार यांचे अहवालानुसार दि.०९.०७.२०१९ रोजीचे वृक्ष प्राधिकरण सभेतील ठराव क्र.२४ वरील निर्णयानुसार अवैध वृक्षतोडण्याबाबत ५००० रु. दंड आकारण्यात आला आहे. दि.०८.०८.२०१९ रोजी जा.क्र.३२६ अन्वये पत्राव्दारे कळविण्यात आले त्यावर अर्जदार यांनी विनंती अर्ज देवून माझी आर्थिक परिस्थीती जेमतेम असून वृक्ष प्राधिकरण व्दारा आकारलेला दंड मी भरण्यास असमर्थ आहे. माझ्या अर्जाचा विचार करुन दंड माफ करण्यास विनंती अर्ज केला आहे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१४:-** वृक्ष अधिकारी यांनी मत नोंदवून सादर करावे व अर्जदाराला दंड भरणेबाबत पत्र देण्यात यावे. .

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१५:-** राधेशाम केशरवाणी शारदा नगर अमरावती. १ आंबा वृक्ष अवैधरीत्या तोडल्याबाबत.



Scanned by CamScanner

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर प्रकरण मा.तांत्रिक सल्लागार यांचे अहवालानुसार दि.०९.०७.२०१९ रोजीचे वृक्ष प्राधिकरणं सभेतील ठराव क्र.१८ वरील निर्णयानुसार अवैध वृक्षतोडण्याबाबत ५००० रु. दंड आकारण्यात आला आहे. दि.०८.०८.२०१९ रोजी ज.क्र.३२१ अन्वये पत्राव्दारे कळविण्यात आले त्यावर अर्जदार यांनी विनंती अर्ज देवून परवानगी न घेता वृक्षाच्या फांद्याची छटाई केली. वृक्षाचे संगोपण पुर्ण करण्याची हमी घेत आहे. आवारात वृक्ष लावण्याची हमी घेत आहे. असे अर्जामध्ये नमुद केले आहे. वृक्ष प्राधिकरण व्दारा आकारलेला दंड मला माफ करण्यात यावे. असा विनंती अर्ज केला आहे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१५**:- अर्जदाराला दंड भरणेबाबत पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१६**:- सुधाकर चंपतराव उमेकर, शामनगर अमरावती. १ कडूबदाम वृक्ष अवैध तोडल्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर प्रकरण मा.तांत्रिक सल्लागार यांचे अहवालानुसार दि.०९.०७.२०१९ रोजीचे वृक्ष प्राधिकरण सभेतील ठराव क्र.२५ वरील निर्णयानुसार अवैध वृक्षतोडण्याबाबत ५००० रु. दंड आकारण्यात आला आहे. दि.०८.०८.२०१९ रोजी जा.क्र.३२७ अन्वये पत्राव्दारे कळविण्यात आले त्यावर अर्जदार यांनी १६.०९.२०१९ रोजी विनंती अर्ज देवून वृक्षाची फांदी वॉल कंपाऊंडवर पडल्यामुळे ती फांदी छाटण्यात आली असे अर्जदाराने नमुद केले. वृक्ष प्राधिकरण व्दारा आकारलेला दंड मला माफ करण्यात यावे असा निवंती अर्ज केला आहे. विनंती उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१६**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. फांदी काढलेल्या वृक्षाची पाहणी करण्यात यावी व पुन्हा अहवाल सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१७**:- राजेंद्र प्रल्हादराव पंढरपुरकर अमरावती. ३ वृक्ष अवैधरीत्या तोडल्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर प्रकरण मा.तांत्रिक सल्लागार यांचे अहवालानुसार दि.१३.०८.२०१९ रोजीचे वृक्ष प्राधिकरण सभेतील ठराव क्र.१ वरील निर्णयानुसार अवैध वृक्षतोडण्याबाबत ५००० रु. दंड आकारण्यात आला आहे. दि.१६.०९.२०१९ रोजी जा.क्र.४१० अन्वये पत्राव्दारे कळविण्यात आले त्यावर अर्जदार यांनी दि.०७.१०.२०१९ रोजी विनंती अर्ज देवून वृक्षाच्या फांद्या मराविवि मंडळाची माणसे आलीत व त्यांनी सदर्हू झाडाच्या फांद्या तोडल्या असे अर्जदाराने नमुद केले ५००० रु. दंड आकारु नये ही नम्र विनंती केली आहे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१७**:- वृक्ष अधिकारी यांनी MSEB मार्फत पाहणी करण्यात यावी व त्यांचा अभिप्राय मागवावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१८**:- चंद्रशेखर मधुकरराव पत्तेवार अमरावती. १ वृक्ष अवैधरीत्या काढल्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर प्रकरण मा.तांत्रिक सल्लागार यांचे अहवालानुसार दि.०९.०७.२०१९ रोजीचे वृक्ष प्राधिकरण सभेतील ठराव क्र.५ वरील निर्णयानुसार ५ वृक्षाचे अनामत रक्कम भरण्याचे कळविले. त्यांनी विनंती अर्ज करुन २ वृक्षाची रक्कम भरण्यास समर्थ आहे असे कळविले. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१८**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. अर्जदाराला पुर्ण दंड भरणेबाबत पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१९**:- मनिष विरेंद्र जगताप व गौरव काळे अमरावती. ४ सुबाभुळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१८.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय – सुबाभुळ व इतर एक व दोन वृक्षाच्या घराकडे व तारेकडे झुकलेल्या (४ इंच व्यासापर्यंतच्या) फांद्या मनपाच्या शक्तीमानव्दारा काढून देण्यास हरकत नाही. वृक्ष सार्वजनिक जागेवर आहेत व हिरवेगार आहे. फांद्या काढतांना वृक्षातचा तोल बिघडणार नाही याची काळजी घेण्यात यावी. सदर प्रकरण मुळनस्तीसह उद्यान विभागात पाठविण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१९**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२०**:- ॲड. रोहीत श कलोती अमरावती. १ गुलमोहर, १ कडूनिंब वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.१५.१०.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.वृक्ष अधिकारी यांचेसह संयुक्तरीत्या स्थळ निरीक्षण करण्यात आले असता सार्वजनिक जागेवरील आजुबाजुचे घराकरीता धोकादायक असलेली दोन वृक्ष गुलमाहर व कडूनिंब हे एकत्र वाढल्याने एकमेकाम गुरफटलेली असून सदर दोन्ही वृक्षांना वाळवी लागून दोन्ही वृक्ष कमकुवत झाले असून वाळलेली व धोकादायक असल्याचे निदर्शानास आल्याने.मा.आयुक्त मनपा यांचे दि.१३.०५.२०१९ चे धोकादायक झाले झाडे/वृक्ष निर्मुलना संदर्भात आवश्यक कार्यवाही व योग्य आदेश आपले स्तरावर निर्गमित करण्याचे आदेशान्वये सदर धोकादायक दोन वृक्ष गुलमोहर व कडूनिंब तात्काळ काढणे गरजेचे असल्याने काढण्याची परवानगी देण्यात आली. कार्योत्तर मंजुरीस सादर. उचित निर्णयास्तव सादर.



Scanned by CamScanner

- **<u>ठराव क्र.२०</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.२१</u>**:- कैलास मोतीराम ककरानिया अमरावती. १ उंबर वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२३.१०.२०१९ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांचे सह संयुक्तरीत्या स्थळ निरीक्षण करण्यात आले असता आवारात उंबराचे वृक्ष असून त्याच्या फांद्या अर्जदाराच्या घरावर झुकलेल्या असल्यामुळे २-४ इंज डायमिटर जाडीच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. मा.आयुक्त मनपा यांचे दि.१३.०५.२०१९ चे धोकादायक झालेली झाडे/वृक्ष निर्मलना संदर्भात आवश्यक कार्यवाही व योग्य आदेश आपले स्तरावर निर्गमित करण्याचे आदेशान्वये सदर धोकादायक उंबराच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यात आली. कार्योत्तर मंजुरीस सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**<u>ठराव क्र.२१</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**पुर्व झोन क्र.३**

**<u>अर्ज क्र.१</u>**:- श्री.आर.एम.लोखंडे, मुख्याध्यापक शासकिय तंत्रनिकेतन अमरावती. १९ वृक्ष तोडण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – अर्जदारांच्या १२/०९/२०१९ च्या पत्रानुसार १९ वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदल्यात संस्थेने ५७ वृक्ष लावण्याचे व तसा अहवाल वृक्ष प्राधिकरणकडे द्यावा. असे आदेशित करण्यात यावे.

**<u>ठराव क्र.१</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून १९ वाळलेले व धोकादायक वृक्ष काढणेच्या बदल्यात ५७ वृक्ष लावणे व लागवड केलेल्या वृक्षाचा अहवाल दर ६ महिन्यांनी ३ वर्षेपर्यंत सादर करावा लागेल, परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.२</u>**:- श्री.वामनराव बनसोड, फॉरेस्ट कॉलनी अमरावती. १ बोर, १ महावृक्ष वृक्ष च्या फांद्या तोडण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.०५/१०/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदार च्या घराकडे झुकलेल्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

**<u>ठराव क्र.२</u>**:- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे अर्जदाराला घराकडे झुकलेली ४ इंच पर्यंतची फांदी काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.३</u>**:- श्री.रजनिकांत कांबळे, फ्रेजरपुरा अमरावती. १ कडुनिंब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०५.१०.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडूनिंब वृक्ष छान वाढलेला आहे. सबब, वृक्ष तोड परवानगी नाकारण्यात यावी. तसेच रस्त्यावर व झाडा पर्यंत येणारे अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यवाही करावी.

**<u>ठराव क्र.३</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.४</u>**:- श्री.गजानन भुसारी, यशोदा नगर अमरावती. १ शिसव वृक्ष विनापरवानगी तोडल्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – श्री.गजानन भुसारी यांना विनापरवानगी वृक्ष तोडल्यामुळे दि.०६/०७/२०१९ रोजी नोटीस देण्यात आली होती. त्यावर दि.०९/०७/२०१९ ला त्यांनी नोटीसला उत्तर दिले. परंतु उत्तर समाधानकारक न वाटल्यामुळे वृक्ष प्राधिकरण समिती ने त्यांना ५ हजार रुपये दंडात्मक कार्यवाही करण्याचे आदेशित केले. त्यांना दि.१६.०९.२०१९ रोजी दंडात्मक कार्यवाहीचे पत्र दिले असता त्यांना पत्र घेण्यास नकार दिला . त्यावर मा.सहा.आयुक्त यांनी विधि अधिकारी यांचा अभिप्राय घेण्याकरीता प्रकरण विधी विभागास पाठविले, त्यावर विधी अधिकारी यांनी सदर प्रकरण वृक्ष प्राधिकरण कडे वृक्ष प्राधिकरण सभेत ठेवणे उचित राहील असा अभिप्राय दिला.

**<u>ठराव क्र.४</u>**:- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष प्राधिकरण सभेत ठरल्याप्रमाणे अर्जदाराला रजिस्टर पोस्ट ने पत्र पाठविण्यात यावे. व दंड न भरल्यास घर टॅक्स मधून कापून घ्यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.५</u>**:- श्री.मनोहर देवरे, भोवते लेआऊट बेनोडा अमरावती. विद्युत तारांना स्पर्श करणाऱ्या वृक्ष च्या फांद्या तोडण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर प्रकरणात विद्युत तारावर आलेल्या फांद्या छाटण्याबाबत मा.कार्यकारी अभिंयता MSEB यांना दि.०३.१०.२०१९ रोजी जा.क्र.१४४/१९ नुसार परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**<u>ठराव क्र.५</u>**:- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**<u>अर्ज क्र.६</u>:**- सौ.साधना हटकर, यशोदा नगर अमरावती(अपिल अर्ज). १ पिंपळ वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर वृक्ष रस्त्याच्या कडेला सार्वजनिक जागेवर आहे. वृक्षा पर्यंत अतिक्रमण होवू नये म्हणून वृक्ष तोडून टाकावे असे परीसरातील नागरीकांना वाटते. मनपाने वारंवार अतिक्रमण करणाऱ्या विरुध्द कार्यवाही करायला हवी दि.१३.०८.२०१९ च्या सभेतील ठराव क्र.१३ नुसार वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारली आहे. तोच निर्णय कायम करुन वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**<u>ठराव क्र.६</u>:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे सदर वृक्षाची पुर्न पाहणी करावी. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.७</u>:**- श्री.विजय हरीशचंद्र खंडेलवाल, कॉंग्रेस नगर अमरावती. अशोका वृक्ष विनापरवानगी तोडल्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर प्रकरणात विजय खंडेलवाल यांना विनापरवानगी अवैध वृक्ष तोड केल्या प्रकरणी ५००००/- रुपये दंड भरण्याचे पत्राव्दारे आदेशित केले होते. परंतु त्यांनी उद्याप पर्यंत दंडाची रक्कम भरलेली नाही. सदर दंडात्मक रक्कमेची वसूली घरटॅक्स मध्ये जोडून करावी लागेल.

**<u>ठराव क्र.७</u>:**- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे, अहवालाप्रमाणे कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.८</u>:**- डॉ.एच.आर.देशमुख, रजिस्टार संत गाडगे बाबा विद्यापिठ अमरावती. (१ कांचन, २ हिवर, १ कडुनिंब वृक्ष ) अनामत रक्कम बाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – सदर प्रकरणात दि.२६.०४.२०१९ च्या सभेतील ठराव क्र.३ नुसार ४ वृक्षाची अनामत रक्कम १३,८४०/- रुपये भरणे बाबत पत्र दिले होते. त्यावर त्यांनी दि.११.०६.२०१९ रोजी पत्राव्दारे विद्यापिठाचा वृक्ष रोपणाचा कार्यक्रम सतत चालु असतो एकदा वृक्षरोपण केल्यावर त्याच्या संगोपनाची जबाबदारी विद्यापिठाची असते. वृक्षाच्या संगोपन व संरक्षणासाठी विद्यापिठ स्वत: ट्रिगार्ड खरेदी करते व उपरोक्त रक्कम जमा करण्याकरीता विद्यापिठाकडे कोणतीही आर्थीक तरतुद नाही. तसेच परीसरातील वाळलेली झाडे विनामुल्य हिंदु स्मशानभुमीत दान करते. त्यामुळे सदर रक्कमेचा भरणा करणे शक्य होणार नाही. याबाबतचे पत्र प्राप्त झाले होते. ते प: मागील सभेत ठेवण्यात आले होते. त्यासभेतील ठराव क्र.१ अन्वये त्यांची मागणी अमान्य करण्यात आली होती व त्यानुसार त्यांना दि.०८.०८.२०१९ रोजी पत्राव्दारे कळविण्यात आले होते. त्यावर त्यांनी दि.१३.०९.२०१९ रोजी परत एक पत्र दिले असून त्यामध्ये त्यांनी विद्यापिठ परीसरातील ७० इमारतीचा मालमत्ता कर दरवर्षी २७,४७,४६६/- रुपये मनपाला अदा करण्यात येतो. त्यामध्ये सामान्य कर, अग्नी कर, वृक्ष कर, स्ट्रिट कर इत्यादीचा समावेश आहे. परंतु त्या करांच्या मोबदल्यात कुठलीही सेवा विद्यापिठाला दिलेली नाही. तसेच यापुर्वी ही झाडे कापण्याची परवानगी विना अट प्राप्त झाली आहे. अश्या आशयाचे पत्र मिळाले आहे.

**<u>ठराव क्र.८</u>:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे अर्जदाराला अनामत रक्कम भरावी लागेल याबाबत पत्र देण्यात यावे. तसेच यापुर्वी दिलेल्या वृक्ष परवानगी मध्ये लावण्यात आलेल्या वृक्षांचा अहवाल अद्यापपर्यंत सादर केला नसल्याने पुढील सभेत अहवाल सादर करण्याबाबत कळवावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.९</u>:**- प्र.अरुणा हाडके, जिजाऊ नगर अमरावती. १ कडूनिंब वृक्ष ची फांदी काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सार्वजनिक रस्त्याच्या कडेला असलेला कडूनिंब वृक्षाची तारावर येणारी एक फांदी MSEB ने काढली आहे. असे अर्जदाराव्दारे पाहणी केली असता सांगण्यात आले. कृपया कार्योत्तर मान्यता देण्यात यावी.

**<u>ठराव क्र.९</u>:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे फांद्या काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.१०</u>:**- श्री.रघुनाथ गोमाजी माहोरे, वामन सोसायटी डेंन्ट कॉलेज समोर अमरावती. १ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.१३.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सागवान वृक्ष छान वाढलेला आहे. अर्जदाराने नमुद केलेल्या कारणासाठी परवानगी देता येत नाही. सबब परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा करु नये असे फरमाविण्यात यावे.

**<u>ठराव क्र.१०</u>:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>अर्ज क्र.११</u>:**- श्री.जयदेव महादेवराव गोंडाणे, प्रभु कॉलनी अमरावती. ६ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.३०.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराच्या शेजारी असलेले ॲड देशमुख यांच्या स्वताच्या घरात सागवान वृक्ष छान वाढलेली आहे. अर्जदाराचा वृक्षाशी काहीही संबंध नाही. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी



Scanned by CamScanner

नाकारण्यात यावी. तसेच अर्जदाराच्या घरी वृक्ष लावून वाढलेला दिसत नाही. अर्जदारास ३० दिवसाचे आत अहवाल पाठविण्याचे आदेशित करावे. अहवाल प्राप्त न झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे फरमाविण्यात यावे.

**ठराव क्र.११:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे, अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१२:-** श्री.हर्षल भानुदास कदम, मोती नगर अमरावती. १ कडुनिंब वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.१८.०८.२०१९ रोजी वृक्ष पडण्याच्या स्थितीत असल्यामुळे वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र.१२:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१३:-** मा.कुलसचिव संत गाडगे बाबा विद्यापिठ अमरावती. १ वाळलेला ख्रिसमस वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.१३.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता विद्यापिठाच्या मुख्य प्रशासकिय इमारती मध्ये सदर वाळलेला वृक्ष होता. त्याला त्वरीत काढणे गरजेचे असल्यामुळे दि.०३.१०.२०१९ रोजी वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र.१३:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१४:-** मा.प्रबंधक जिल्हा सत्र न्यायालय अमरावती. १ वाळलेला कडूनिंब वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.१९.०८.२०१९ रोजी वाळलेला वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र.१४:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१५:-** ह.म.जोशी उपविभागीय अधिकारी राट्रीय महागमार्ग उपविभाग अमरावती. २ वाळलेले वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.३०.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता दोन्ही वृक्ष वाळलेले असल्यामुळे दोन्ही वृक्षांना दि.०३.१०.२०१९ रोजी तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र.१५:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१६:-** श्री.एस.बी.चव्हाण उपसंचालक अनुसुचित जमाती प्रमाणपत्र समिती अमरावती. ३ वाळलेले वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.१३.०९.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता तीन वृक्ष वाळलेले असल्यामुळे तीन वृक्षांना दि.०३.१०.२०१९ रोजी तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र.१६:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**पश्चिम झोन क्र.४**

**अर्ज क्र.१:-** श्री.ने.बा.मांडवगडे, न्यु स्वास्तिक नगर रवि नगर, अमरावती. १ सुकलेले आडजात वृक्ष तोडण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल- सुकलेले वृक्ष सार्वजनिक जागेवर असल्याने नियमानुसार त्वरीत काढण्याची कार्यवाही प्राधिकरणाने (मनपाने) करावी. अहवालानुसार वृक्ष काढण्याची कार्यवाही करण्यात आली असून कार्योत्तर मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र.१:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:-** श्री.निलेश अरविंद मसतकर, हरिओम कॉलनी, अमरावती. १ सुकलेले गुलमोहर वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.



Scanned by CamScanner

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल- सुकलेले वृक्ष सार्वजनिक जागेवर असल्याने नियमानुसार त्वरीत काढण्याची कार्यवाही प्राधिकरणाने (मनपाने) करावी. अहवालानुसार वृक्ष काढण्याची कार्यवाही करण्यात आली असून कार्योत्तर मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र.२:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:-** सहा.अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, (अंबिका कुलिंग नवाथे) अमरावती. २ महारुक वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०४/१०/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - महामार्ग जुना या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सुरु असून वृक्ष पाईप लाईन च्या बांधकामात आल्याने दोन महारुकाचे वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबद्दल २x३=६x३४६०=२०७६०/- रुपये (वीस हजार सातशे साठ रुपये) भरुन बदली वृक्ष लावण्यासाठी ठेव ठेवल्यानंतर परवानगी देण्यास हरकत नाही. तांत्रिक सदस्यांच्या अहवालानुसार नमुद रक्कमेचा अर्जदाराकडून भरणा केल्यानंतर वृक्ष काढण्याच्या मंजुरी करीता सादर.

**ठराव क्र.३:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. २ वृक्ष काढणेच्या बदल्यात ६ वृक्ष लावणे याप्रमाणे ६x३४६०= २०७६०/- रु. अनामत ठेव ठेवून व लागवड केलेल्या वृक्षाचा अहवाल दर ६ महिन्यांनी ३ वर्षेपर्यंत सादर करावा लागेल याप्रमाणे धोरणानुसार परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.४:-** श्री.मुकुंद नारायण फाटक, न्यु कृष्णार्पण कॉलनी अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०४/१०/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल – कडुनिंबाचे वृक्ष अर्जदाराच्या घराच्या आवारात छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाच्या ताराकडे झुकलेल्या बारीक फांद्या २ इंचापेक्षा कमी रुंदीच्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. सदर अहवालानुसार फांद्या तोडण्याची परवानगी करीता सादर.

**ठराव क्र.४:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे अर्जदाराला वृक्षाच्या २ इंच डायमिटर पर्यंत फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.५:-** श्री.राजेंद्र महादेवराव चिखलकर, व्यंकटेश कॉलनी शंकर नगर अमरावती. १ वड वृक्ष ची फांदी काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.२९/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल – वृक्ष छान हिरवेगार वाढलेले असून रस्त्याचे कडेला सार्वजनिक जागेवर आहे. विद्युत तारेकडे झुकलेले एक फांदी शक्तीमान यंत्राव्दारे काढावी लागेल. सदर अहवालानुसार एक फांदी शक्तीमान यंत्राव्दारे काढण्याकरीता मंजुरीस सादर.

**ठराव क्र.५:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.६:-** श्री.पारसी अग्यारी, नवीवस्ती बडनेरा. १ महारुक वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.२९/१०/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल –२९.०८.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले होते परंतु वृक्ष हा अर्जदाराच्या मालकिच्या जागेवर नव्हता तो पारसी अग्यारी संस्थेच्या जागेवर होता. सबब अर्जदाराला वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारली होती परंतु पारसी अग्यारी संस्थेने सदर वृक्षाच्या फांद्या तोडण्याकरीता अर्ज सादर केलेला आहे त्यानुसार सदर पारसी अग्यारी संस्थेला वृक्षाच्या फांद्या तोडण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. सदर अहवालानुसार फांद्या तोडण्याची परवानगी करीता सादर.

**ठराव क्र.६:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे अर्जदाराला वृक्षाच्या २-४ इंच डायमिटर पर्यंत फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ७:-** श्री.नामदेव जयराम गेडाम, शारदा नगर नवीवस्ती बडनेरा. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.२९/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल –कडूनिंबाचे वृक्ष घराच्या आवारात छान वाढलेले आहे, घर मालकाला विचारणा केली असता त्यांनी या जागेवर बांधकाम करावयाचे आहे असे सांगण्यात आले. बांधकामाची परवानगी घेतल्यानंतर वृक्ष तोडण्याबाबत विचार करता येईल. अर्जदाराने वृक्षाला इजा पोहचू नये असे कळविण्यात यावे. तुर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र.७:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष तोडण्याची परवानगी तुर्त नाकारण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ८:**- सरस्वती विद्यालय विद्यापीठ कॉलनी एम.आय.डी.सी.रोड. १ गुलमोहर वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.२९/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल –वृक्ष हिरवेगार व सार्वजनिक जागेवर आहे, कोणतीही अडचण नाही वृक्षाच्या फांद्या अगोदरच काढल्या असून वृक्षाचा भर कमी करण्यात आलेला आहे. तसेच वृक्षाला इजा पोहचण्याची शक्यता आहे करीता पेंट काढण्याकरीता सुचवावे लागेल. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र.८:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे तातडीने कार्यवाहीचे पत्र द्यावे व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ९:**- श्री.भरत मोतीराम गायधनी, माळीपुरा नवीवस्ती बडनेरा. १ पिंपळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.२९/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल –वृक्ष अर्जदाराचे घरी अथवा मालकिचे जागेवर नाही व सार्वजनिक जागेवर सुध्दा नाही. वृक्ष शेजाऱ्यांच्या मालकिचे जागेवर आहे. (वृक्ष श्री. चौधरी यांचे मालकिचे जागेवर आहे) सबब श्री.चौधरी यांचा अर्ज असल्यास फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. श्री.चौधरी यांना अर्ज दाखल कळवावे लागेल. सध्या वृक्षाच्या फांद्या तोडण्याबाबत परवानगी देता येणार नाही म्हणून फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र.९:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १०:**- अर्चना सुभाष कोळसेकर, सुशिल नगर अमरावती. १ उंबर वृक्ष बाबत दंडात्मक कार्यवाहीबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.२९/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल – सदर वृक्ष सार्वजनिक जागेवर असून वृक्षाला २ इंच रुंदीचा करवा करण्यात आलेली असल्याने वृक्ष अर्जदाराने वाळविण्याचा व नष्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसून आला, अर्जदाराविरुध्द दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी व तशी नोटीस बजावण्यात यावी. सदर अहवालानुसार अर्जदारास दि.०९.०९.२०१९ रोजी याबाबत पत्र देवून खुलासा मागविण्यात आला व प्राप्त खुलासा अमान्य करुन दंडात्मक कार्यवाही करीता सादर.

**ठराव क्र.१०:**- वृक्ष अधिकारी यांनी तातडीने दंडात्मक कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**पश्चिम झोन क्र.५**

**अर्ज क्र.१:**- श्री.श्रीधर उत्तमरव पिठेकर महाजनपुरा, शिवाजीगेटच्या नाल्याजवळ अमरावती. १ गुलमोहर वृक्ष च्या विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या फांद्या तोडण्याची परवानगी देणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता गुलमोहराचे मोठे हिरवेगार वृक्ष आहे. काही फांद्या विद्युत तारेला स्पर्श करत आहे व काही फांद्या घरावर येत आहेत. तरी विद्युत तारांना स्पर्श करणाऱ्या व घरावर येत असलेल्या ३ ते ४ डायमिटर इंचाच्या फांद्या छाटण्यास परवानगी देण्यात हरकत नसावी.

**ठराव क्र.१:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या २-४ इंच डायमिटर पर्यंतच्या फांद्या काढण्याकरीता MSEB मंडळाला पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:**- श्री.गजानन महाराज मंदिर संस्थान तर्फे बाबाराव पाटील, प्लॉट क्रमांक २२७, २२६ कुंभारवाडा अमरावती. १ कडुनिंब, १ औदुंबर वृक्ष तोडण्याची परवानगी तुर्त नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – अर्जदाराने झाडाच्या फांद्या तोडण्याची परवानगी मागीतलेली आहे. परंतु तांत्रिक सदस्य यांची पाहणी झाली नसल्याने अहवाल प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केल्या नंतर सादर केल्या जाईल.

**ठराव क्र.२:**- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**विषय क्र.४ :-- वृक्ष प्राधिकरण मनपा अमरावती अर्थसंकल्प सन २०१९-२० समितीसमोर सा**

अमरावती महानगरपालिका अमरावती

सन 2019-20 चे बजेट

| 01/04/2019 ते 30/09/2019 | | | | | 01/10/2019 ते 31/03/2020 | | | | 01/04/2020 ते 31/03/2021 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु.क्र. | शिर्ष | प्रत्यक्ष उत्पन्न | प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | अंदाजित उत्पन्न | अंदाजित खर्च | अंदाजित शिल्लक | कॉलम नं.5+8 | अंदाजित उत्पन्न | अपेक्षित खर्च |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | मागिल जमा | 2219307 | | | | | | | | |
| 2 | वृक्ष उपकर | 3636849 | 5619941 | 2322625 | 2000000 | 1800000 | 200000 | 2822625 | 5000000 | 16300000 |
| 3 | वृक्ष प्राधिकरण | 2086410 | | | 1000000 | 700000 | 300000 | | 4000000 | |
| 4 | वृक्ष प्राधिकरण ठेव | 11636092 | 0 | 11636092 | 2000000 | 0 | 2000000 | 13636092 | 2600000 | |
| 5 | एकुण | 19578658 | 5619941 | 13958717 | 5000000 | 2500000 | 2500000 | 16458717 | 11600000 | 16300000 |

समिती समोर वरील प्रत्यक्ष झालेल्या खर्चाबाबत माहिती देण्यात आली व माहीतीचे अवलोकन करुन समिती सदस्यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे तातडीने आवश्यक शक्तीमान मशिन व आवश्यक ट्रॅक्टर सोबत लागणारे अवजारे व मशिनरी घेण्यात याव्या. सदर सांगोपांग चर्चे नंतर सादर बजेट मंजुर करण्यात आले.

**विषय क्र.५ :-मा.सभापती, यांच्या मंजुरीने वेळेवर येणारे विषय,**

**क्र.१:-** श्री.सुनिलकुमार महेंद्रकुमार अग्रवाल

**विषय** — ग्रीनस्पेस डेव्हलपमेंट चे सुधारीत जागेवरील काटेरी झुडुपे, बंगाली बाभूळ झुडुपे काढणेबाबत

**ठराव क्र.१** — सदर ठिकाणी शासनाच्या ग्रीनस्पेस डेव्हलपमेंट मध्ये तातडीने वृक्ष लागवड पुर्ण करण्याची असल्याने या ठिकाणी असलेली मोठी झाडे वगळून काटेरी झुडूपे काढण्यास व बंगाली बाभुळी चे झुडपे काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**क्र.२:-** सन्मा.अजय दयारामजी सारसकर, सभापती शहर सुधार समिती, नगरसेवक मनपा अमरावती.

**विषय** — शहरात मोठ्या प्रमाणात नविन रस्त्योचे (कॉंक्रीट) बांधकाम मोठ्या प्रमाणात सुरु असून व काही रस्त्यांचे दुरुस्तीचे काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे. परंतु रस्त्याच्या आजु-बाजुने वृक्ष लागवड करण्याचे काम मात्र सुरु करण्यात आले नसल्याबाबत.

**ठराव क्र.२** — सदर बाबत सा.बां.विभागाने शहरात केलेले रस्त्याचे कॉंक्रीट रस्ते व रस्ते रुंदीकरणात घेतलेल्या सर्व रस्त्याच्या कडेला केलेल्या वृक्ष लागवडीचा अहवाल तसेच ज्याठिकाणी काम करणे बाकी आहे किंवा सुरु आहे अशा ठिकाणचे वृक्ष लागवडीचे नियोजनाचा आराखडा व अहवाल सादर करण्यात यावा. असे सर्व सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांनी सा.बां.विभागास पत्र द्यावे व तसा अहवाल मागवावा व ज्या वृक्षांची परवानगी मागितलेली आहे त्या बाबत स्टेपवाईज करण्यात येणाऱ्या कार्यवाही बाबत पत्र द्यावे तसेच काही वृक्ष स्थलांतराबाबत अहवाल मागवावा व तातडीने झोन निहाय अहवाल सभापती वृक्ष प्राधिकरण समिती यांचेकडे सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

वाळलेला प्रत्येक वृक्ष काढण्याबाबतच्या अहवालात त्याच प्रजातीची किंवा इतर प्रजातीची वृक्ष लावण्याची अट टाकण्यात यावी. असे निर्देश मा.सभापती महोदय यांनी दिले. यानंतर कार्यक्रम पत्रीकेवरील विषय संपुष्टात आल्यामुळे उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

~~मा.सभापती~~ तथा आयुक्त,
महानगरपालिका अमरावती



Scanned by CamScanner